दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २२४ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.९ नोव्हेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# एसटी कर्मचाऱ्यांचा संप चिघळणार; कर्मचारी संपावर ठाम

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्य शासनाच्या मागण्यांवर निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाने एक समिती स्थापन करण्याचा जीआर काढला आहे. मात्र, हा जीआर अमान्य असल्याचं सांगत एसटी कर्मचाऱ्यांनी आपण संपावर ठाम असल्याचं स्पष्ट केलं. संपाच्या ११ व्या दिवशीही तोडगा न निघाल्याने एसटी कर्मचाऱ्यांचा संप अधिक चिघळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



एसटी महामंडळाचं राज्य सरकारमध्ये विलनीकरण करण्यासाठी गेल्या ११ दिवसांपासून एसटी कर्मचारी संपावर आहेत. आज कोर्टात संपाबाबतची सुनावणी झाली. त्यानंतर एसटी कर्मचाऱ्यांचे वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मीडियाशी संवाद साधत कोर्टातील कार्यवाहीची माहिती दिली. ३६ एसटी कर्मचाऱ्यांनी आत्महत्या केली आहे. त्यामुळे आम्ही दुखवटा पाळत असून त्यासाठीच संप पुकारला आहे. हा संप फोडण्याचा प्रयत्न सुरू आहे. आमच्या दुखवट्याला पोलिसी बळावर हात लावण्याचा प्रयत्न करू नका, असं सदावर्ते म्हणाले.

सरकारची घुमजावची भूमिका आहे. सरकारचा खोटारडेपणा सुरू आहे. त्यामुळे आम्ही आमचा पूर्वीचा युक्तिवाद न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिला. हेच ते कारण होतं. एखाद्या जातीच्या संदर्भात कर्नाटकाचा संदर्भ दिला जातो. मग एसटी कर्मचाऱ्यांबाबत तेलंगनाचा संदर्भ यांना अमान्य का झाला? पॅरेग्राफ सहा या पॉलिसीत का आणला नाही? हे सरकार खोटारडं आहे. ८२ हजार लोकांची मते न्यायालयात मांडली. सह्यांसहीत आमची मते कोर्टाला दिली. आम्हाला तुरुंगात टाकण्याची भाषा ठाकरे सरकारकडून केली जात होती. गांधी–आंबेडकरांप्रमाणे आम्ही ८२ हजार लोक तुरुंगात जावून बसायला तयार आहोत. आम्ही अन्नत्याग करायला तयार आहोत. मग चर्चा तुरुंगातच होऊ द्या, असं आम्ही सरकारला स्पष्ट केलं आहे, असं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, संपावर आजही तोडगा निघालेला नाही. त्यामुळे संप चिघळण्याची शक्यता आहे. राज्य सरकारने स्थापन केलेली समिती अमान्य असल्याचं एसटी कर्मचाऱ्यांनी स्पष्ट केलं. एसटी महामंडळाचं थेट राज्य शासनात विलिनीकरण केल्याचा जीआर काढण्यात यावा, अशी मागणीच एसटी कर्मचाऱ्यांनी लावून धरल्याने हा संप चिघळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# पनवेल उरण रस्त्याला सिडकोची सावत्र वागणूक

## रस्ता बनला आहे मृत्यूचा सापळा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्य महामार्ग क्रमांक १०३ अर्थात पनवेल उरण जुना रस्ता हा सध्या मृत्यूचा सापळा बनला आहे. मोठे खड्डे आणि धुळीचे साम्राज्य यातून प्रवास करताना नागरिक जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करत असतात. कित्येक निष्पाप नागरिकांचे बळी घेणाऱ्या या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम नक्की कोणाच्या अखत्यारीत येते? याचा शोध घेतला असता सिडकोचा निष्क्रिय पणा चव्हाट्यावर येतो.



जून २०१६ पर्यंत या रस्त्याच्या देखभालीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे होते. त्यानंतर वडघर खाडी पूल ते गव्हाण फाटा अशा नऊ किलोमीटर लांबीच्या रस्त्याच्या देखभालीचे काम सिडको कडे वर्ग करण्यात आले. एकविसाव्या शतकातील शहर वसविणारे अशी बिरुदावली मिरवणाऱ्या सिडकोने या महत्त्वपूर्ण रस्त्याकडे अक्षरशः दुर्लक्ष केले आहे.वास्तविक पाहता प्रवासी वाहतुकीसाठी आजही या रस्त्याचा वापर प्रथम प्राधान्याने केला जातो.राज्य महामार्ग मंडळाच्या सगळ्या बसेस या रस्त्यावरून धावतात. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ ब हा उभारल्यानंतर देखील पनवेल–उरण जुन्या रस्त्यालाच प्रवाशांची प्रथम पसंती असते.जासई, गव्हाण, उलवे नोड या ठिकाणी जाण्यासाठी नागरिकांना हा रस्ता वापरणे अपरिहार्य आहे.

या रस्त्याला गव्हाण फाट्याच्या अगोदर राष्ट्रीय महामार्गासाठी एन्ट्री आणि एक्झिट पॉईंट दिलेला आहे. या ठिकाणी तर दोन ते अडीच फूट खोल खड्डे पडलेले आहेत. या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्यांना मणक्याचे आजार, पाठ दुखी, मानेच्या व्याधी जडल्या आहेत. कित्येक निष्पाप जीव अपघातात मारले गेले आहेत. छोटे मोठे अपघात तर रोज घडत असतात.पनवेल उरण रस्त्याची नव्याने बांधणी करण्याची गरज निर्माण झाली आहे. या रस्त्यावरील वर्दळ पाहता सिडकोच्या माध्यमातून रस्ता दुरुस्ती का झाली नाही? असा रोषपूर्ण सवाल नागरिक विचारत आहेत. सिडकोचे मुख्य अभियंता, कार्यकारी अभियंता डोळ्यावर पट्टी बांधून बसले आहेत काय? असा सूर देखील जनतेतून उमटत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असेपर्यंत या रस्त्याच्या देखभालीचे काम योग्य पद्धतीने होत होते. परंतु सिडकोच्या अखत्यारीत गेल्यानंतर या रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले असून देखील दुरुस्तीच्या प्रतीक्षेत नागरिकांना रस्ता कापावा लागतो. रस्त्याच्या झालेल्या दुर्दशेमुळे येथे मरण स्वस्त झाले असल्याची भावना नागरिकांच्या हातून उमटते. एरवी कामांच्या बाबतीत सतर्कता दाखवणारी सिडको या रस्त्याच्या बाबतीत सावत्रपणाची भूमिका का म्हणून घेत आहे? हे सामान्य जनतेच्या आकलनाबाहेर गेले आहे.

सिडको अभियंत्यांनी या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती ◀ .../२

## संक्षिप्त...

### राज्यात आज ७५१ नवीन कोरोनाबाधित रुग्णांची नोंद

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोनाबाधितांच्या दैनंदिन रुग्णसंख्येत घट पाहायला मिळत आहे. राज्यात आज ७५१ नवीन कोरोनाबाधित रुग्णांची नोंद झाली आहे. तर १५५५ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहे. राज्यात आतापर्यंत ६४ लाख ६० हजार ६६३ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. त्यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ९७.६२ टक्के आहे.

राज्यात आज १५ रुग्णांच्या मृत्यूची नोंद झाली आहे. राज्याचा मृत्यूदर २.१२ टक्के झाला आहे. राज्यात सध्या १३ हजार ६४९ रुग्णांवर उपचार सुरु आहेत. सध्या राज्यात १,३८,१७९ व्यक्ती होम क्वॉरंटाईनमध्ये आहेत तर ८६५ व्यक्ती संस्थात्मक क्वारंटाईनमध्ये आहेत. आजपर्यंत तपासण्यात आलेल्या ६, ३३ , ०२, ४८९ प्रयोगशाळा तपासण्या करण्यात आल्या आहे. गेल्या २४ तासात मुंबईत २१० नव्या रुग्णांची नोंद झाली आहे तर चार रुग्णांना आपला जीव गमवावा लागला आहे. गेल्या २४ तासात ३१७ रुग्ण कोरोनामुक्त होऊन घरी परतले आहेत. शहराचा रिकव्हरी रेट हा ९७ टक्क्यांवर पोहोचला आहे. मुंबईत सध्या २८१५ इतकी सक्रिय रुग्णसंख्या आहे. शहरात आतापर्यंत ७,३६,२७१ रुग्ण कोरोनामुक्त झाले आहेत. मुंबईतील रुग्णसंख्या दुप्पट होण्याचा कालावधी २१५४ दिवसांवर पोहोचला आहे.

# पत्नीच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकून पसार झालेला पती पोलिसांच्या ताब्यात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पत्नीच्या चेहऱ्यावर ॲसिड फेकून पसार झालेल्या पतीला पनवेल शहर पोलिसांनी त्याच्या झायलो गाडीसह ताब्यात घेतले आहे.

सेक्टर नं. २, करंजाडे येथे राहणाऱ्या ३६ वर्षीय महिला कौटुंबिक वादामुळे पतीचेपासून विभक्त राहते, १५ दिवसांपुर्वी त्यांच्या पतीने त्यांचे व्हट्सअँप स्टेटसवर पत्नीचे आक्षेपार्ह फोटो ठेवल्याने त्यांचे विरूध्द पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. या तक्रारीचा राग मनात धरून पती पवन पाटील (३९ रा.बोर्ले) याने तिच्या राहते घरी येवून अंगावर धावून गेले आणि हातातील प्लॅस्टीक बाटलीमधील कोणतेतरी द्रवरूप अँसिड पत्नीच्या चेहऱ्यावर फेकून तो तेथून पसार झाला होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करताच वपोनि अजयकुमार लांडगे, पो.नि.गुन्हे संजय जोशी यांच्या सुचनेनुसार गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक फरताडे यांच्यासह पो. हवा.राऊत, पो.शि.घरत, पो.ना.झिणे, पो. शि.मिसाळ आदींच्या पथकाने त्याच्या चालू मोबाईलच्याद्वारे तांत्रिक तपासाचा आधार घेवून तसेच गुप्त बातमीदाराच्या आधारे सदर इसम हा पळस्पे या भागात त्याच्याकडे असलेल्या झायलो गाडीसह येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सापळा रचून त्याला ताब्यात घेतले आहे. याबाबत अधिक तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक देवळे करीत आहेत.

# पनवेल शहर जिल्हा काँग्रेस ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी वैभव पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

न्यू मेरिटाईम अँड जनरल कामगार संघटनेचे (एनएमजीकेएस) सरचिटणीस वैभव पाटील यांची नुकतीच पनवेल शहर जिल्हा काँग्रेस ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. वैभव पाटील हे व्यावसायाने केमिकल इंजिनिअर आहेत. या क्षेत्रात ते २८ वर्ष नोकरीही करीत आहेत. त्यामुळे कामगारांसह सर्वसामान्यांनाबरोबर त्यांची नाळ जोडली गेली आहे. रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या २५ वर्षांपासून वैभव पाटील हे कामगार क्षेत्रात कार्यरत आहेत. यामुळे कामगारांचे विविध प्रश्न व अडीअडचणींबाबत तसेच सर्वसामान्यांच्या समस्यांबाबत वैभव पाटील यांना जाणीव आहे. पनवेल शहर जिल्हा काँग्रेस ओबीसी



सेलच्या अध्यक्षपदी वैभव पाटील यांची निवड झाल्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले आहेत. तसेच महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीचे श्री. माळी, रायगड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष महेंद्र घरत, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस अध्यक्ष आर सी घरत यांच्या आशीर्वादाने या पदाची जबाबदारी मिळाली असल्याचे प्रतिपादन वैभव पाटील यांनी केले.


ते पुढे बोलताना म्हणाले की, सर्वसामान्य नागरिक व कामगारांचे विविध प्रश्न जवळून पाहिले असल्यामुळे केवळ ओबीसी सेलच्या कार्यापूरते मर्यादित न राहता या माध्यमातून समाजासाठी काम करण्याची संधी मिळाली असून या संधीचे निश्चितच सोने करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करेन. त्याचप्रमाणे या पदाची जबाबदारी पार पाडत असताना महाराष्ट्र शासनाच्या व केंद्र शासनाच्यावतीने ओबीसींसाठी असलेल्या योजनांची अनेकांना माहिती देखील नसते. अश्यावेळी या सर्व योजना सर्वसामान्यांना कशा पोहोचतील व त्याचा लाभ सर्वांना घेता यावा, यासाठी प्रयत्न केले जातील असे आश्वासन वैभव पाटील यांनी दिले.

काँग्रेस जिल्हाध्यक्ष ◀ .../२

# विविध मागण्यासाठी कोळी बांधवांचा निषेध मोर्चा

**दै.रायगड नगरी । उरण**

वरळी कोळीवाडा मुंबई येथे कोस्टल रोडला विरोध करण्यासाठी, कोळी मच्छिमार बांधवांचे मागण्या पूर्ण होत नसल्याने त्याचा निषेध करण्यासाठी व वरळीकरांना पाठिंबा देण्यासाठी रायगड, पालघर, ठाणे, मुंबई, नवी मुंबई हनुमान कोळीवाडा, रत्नागिरी येथून सर्व कोळी बांधव जमा झाले. आदिवासी कोळी समाज समन्वय समिती महाराष्ट्र राज्य आणि पारंपरिक मच्छिमार बचाव कृती समिती, श्री हनुमान कोळीवाडा मच्छिमार सोसायटी च्या वतीने वरळी कोळीवाडा येथे प्रशासनाचा जाहीर निषेध करण्यात आला.



मुंबई आमच्या कोळ्यांची नाही कोणाच्या बापाची ! समाज बांधवांनो खुप अन्याय होऊ लागलेला आहे आपल्या समाजावर आणि सर्वच बाजूने मग तो कुठलाही असो परंतु आपली कोकण किनार पट्टी पूर्णपणे हद्दपार होत चालली आहे. शासनाने मोठमोठया प्रकल्पांना शेतकरी बांधवाच्या जागा कवडीमोल भावात विकून प्रकल्प ऊभे केलेत. आणि प्रकल्पग्रस्त लोकांना नोकरी आणि प्रशिक्षण न देता सरळ परप्रांतियाची भरती करतात.

शेतकऱ्यांच्या जागा घेऊन आज शेतकऱ्यांना देशोधडीला लावले आहे. आता मात्र शासनाकडे बलाढ्य कंपन्या रिलायन्स, सिडको, एमएमआरडीए, ओएनजीसी, नैना प्रकल्प अशा अनेक कंपन्यांना जागा देण्यासाठी शिल्लक राहिल्या नाहीत. म्हणून शासनाने समुद्रात भराव करुन जागा तयार करत असून मच्छिमार क्षेत्र पूर्णपणे नष्ट करत आहेत. ◀ .../२

# इ-कॉमर्स मार्केटींगमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून सव्वातीन लाखांचा गंडा

**दै.रायगड नगरी । उरण**

व्हाट्सएपवर मेसेज पाठवून इ–कॉमर्स मध्ये गुंतवणूक केल्यास तुम्हाला आकर्षक व्याज मिळेल असे सांगून बँकेतून पर–स्पर ३ लाख २५ हजार रूपये काढून फसवणूक केल्याची घटना उलवे येथे घडली. या प्रकरणी न्हावाशेवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्रिदीवेष त्रिलोचन सातोपती असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

त्रिदिवेष यांना एका दिवशी व्हॉट्सएप वर एक मेसेज आला आणि तुम्ही जर इ–कॉमर्स मार्केटींग मध्ये ५ हजार गुंतवणूक केल्यास तुम्ही दररोज ६०० ते ९०० रूपये पर्यंत कमवू शकता. त्यांच्या या आकर्षक योजनेला भूलून त्रिदिवेष यांना एक लिंक पाठवण्यात आली. त्रिदिवेष यांनी या लिंक वर जाऊन ४६०० रूपये युपीआय मार्फत भरले. त्यानंतर दोन तासानी पैसे मिळतील असे व्हाट्सएपवर मेसेज पाठवून बँक डिटेल्स देण्यास सांगितले.

त्यानंतर त्यांना त्यांच्या बँकते फायदा म्हणून रूपये ४ हजार १९८ पाठविण्यात ◀ .../२

## राज्य परिवहन महामंडळाचे शासनात विलिनीकरणासाठी

# मुरुडमध्ये एस.टी.कर्मचाऱ्यांचा शंभर टक्के बंद

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

राज्य परिवहन महामंडळाचे शासनात विलिनीकरण करून शासन नियमाप्रमाणे सर्व सोयी सवलती व वेतन लागू करण्यात यावे. या मागणीसाठी राज्यासह मुरुड आगारातील कर्मचाऱ्यांनी आमदार गोपिचंद पडळकर, महाराष्ट्र राज्य कनिष्ठ वेतनश्रेणी एस टी कर्मचारी संघटनेचे अजयकुमार गुजर यांनी राज्यव्यापी एस.टी.राज्यशासनात विलिनीकरण करण्यासाठी संपाच्या नोटिसी नुसार दि.७ नोव्हेंबरच्या मध्यरात्री पासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले.बंद शंभर टक्के करण्यात आल्याने आज मुंबई, पुणे व



अन्यत्र जाणाऱ्या तसेच आरक्षण केलेल्या प्रवासी वर्गाचा खोळंबा होऊन त्रास सहन करावा लागला.

याबाबत मुरुड आगारातील सर्व कर्मचाऱ्यांच्या वतीने आगार व्यवस्थापक यांच्या मार्फत पेण येथील ◀ .../२

# अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार ; आरोपी अटकेत

**दै.रायगड नगरी । रोहा**

रोहा तालुक्यात माणुसकीला काळीमा फासणारी घटना रविवारी घडली. अवघ्या ५ वर्षाच्या बालिकेवर ३६ वर्षाच्या नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याचे समोर आल्याने एकच संताप व्यक्त झाला. आरोपी राकेश शिर्के याने अल्पवयीन मुलीला घरी नेवून लैंगिक अत्याचार केले, आरोप–ीला पोलिसांनी रात्री उशीरा रोहा अटक केल्याची माहिती रोहा पोलिसांनी दिली. मुलीला अधिक उपचारार्थ अलिबाग येथे हलविण्यात आले आहे.

रोहा तालुक्यात लैंगिक अत्याचाराच्या घटनांमध्ये अलिकडे वाढ झाली आहे. अत्याचाराचे सत्र सुरु असतानाच रविवारी सायंकाळी रोहा शहरातील पार्टे चाळीत अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची खळबळजनक घटना घडली. सायंकाळी ६ च्या सुमारास लहानगी अंगणात खेळत होती. खेळता–खेळता ती अचानक बेपत्ता झाल्याचे नातेवायिकांच्या लक्षात आले. त्यानंतर त्या मुलीचा आजी–आजोबांनी शोध घेण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी नराधम राकेश शिर्के वय ३६ याने लहानगीला स्ततः च्या घरी नेवून लैंगिक अत्याचार केल्याचे समोर आले. चाळीचे मालक चंद्रकांत पार्टे यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. आरोपीने सबंधीत मुलीवर अत्याचार केला. ही माहिती पोलिसांना समजताच आरोपीने पळ काढला. फिर्यादीच्या म्हणण्यावरुन सदर आरोपी राकेश शिर्के याच्या विरुद्ध ३७६, ३७८(२)(ळ)(ळ), ३७६ (३), ३६३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तदनंतर आरोपीला रोहा पोलिसांनी तातडीने अटक केली. अधिक तपास पेण उपविभागीय पोलीस अधिकारी व्ही. व्ही. चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक तृप्ती बोराडे करीत आहेत. दरम्यान, रोहा तालुक्यात यापुर्वी तांबडी सामुहिक बलात्कार, पेण येथील अल्पवयीन मुलीवर अष्टमी परिसरात लैंगिक अत्याचार प्रकरणे घडली आहेत. त्यांचा तपास अद्याप सुरु आहे. या घटना ताज्या असतानाच रविवारी अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची घटना घडल्याने माणुसकी व कायदा सुरक्षेचा गंभीर प्रश्न रोहा तालुक्यात निर्माण झाला आहे. या घटनेमुळे सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे.

# बेपर्वाईचे बळी

'पुढच्यास ठेच मागचा शहाणा' वगैरे म्हणण्याची पद्धत असली, तरी आपल्याकडील व्यवस्थेत असे कोणी शहाणे होत नसतात; तसे असते तर एकाच प्रकारच्या दुर्घटनांची मालिका राज्यात सुरू राहिली नसती. भंडारा, मीरा-भाइंदर आदी ठिकाणी रुग्णालयांना आग लागल्याने अनेक रुग्णांना हकनाक प्राण गमवावे लागल्याच्या दुर्घटना ताज्या असतानाच अहमदनगर जिल्हा रुग्णालयातही करोना रुग्णांसाठी उभारण्यात आलेल्या अतिदक्षता विभागाला शनिवारी आग लागली आणि त्यात अकरा जणांचा मृत्यू झाला. आधीच्या दुर्घटनांनंतर राज्यातील सर्व रुग्णालयांतील अग्निप्रतिबंधक आणि अग्निशमन यंत्रणा यांची पाहणी करून आवश्यक तिथे उपाययोजना करण्याचा सोपस्कार होऊनही नगरची दुर्घटना घडली. अशा प्रतिबंधात्मक उपचारांकडे गांभीर्याने पाहिले जात नाही, हा याचा अर्थ. एखादी दुर्घटना घडली, की जनक्षोभ कमी करण्यासाठी काही तरी उपाय करावयाचे म्हणून राज्यकर्ते घोषणा करतात, प्रशासन अंमलबजावणीचे उपचार करते, समिती वगैरे स्थापली जाते, अहवाल सादर केला जातो. असे बहुतेक अहवाल नंतर धूळ खात बसतात. लोकही सारे विसरून जातात. पुन्हा अशी दुर्घटना घडली, की परत चर्चा सुरू होते. दुर्घटनांच्या मालिकांतून काही धडा घेतला जात नाही. कुरघोडीचे राजकारण करणारे सत्ताधारी व विरोधक आणि भ्रष्टाचाराने पोखरलेले प्रशासन यांत सर्वसामान्यांचा बळी जात आहे. अशा अपघातांतील बळी हे बेपर्वाईचे बळी असून, दुर्दैवाने या बळींची संख्या वाढत चालली आहे. नगरमधील दुर्घटनेनंतर चौकशीचा आदेश देण्यात आला आहे, दोषींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला आहे आणि मृतांच्या नातेवाइकांना मदत जाहीर झाली आहे; परंतु यांमुळे गेलेले जीव परत येणार नाहीत. नगर जिल्हा रुग्णालयातील आगीची दुर्घटना नक्कीच टाळता आली असती. नियम बाजूला सारून बांधकाम झाल्याचे आणि अतिदक्षता विभागातील वायरिंग सदोष असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले होते; तसेच शॉर्ट सर्किटमुळे वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना घडत असल्याने मोठ्या दुघटनेची शक्यताही वर्तविण्यात आली होती. मात्र, या साऱ्यांकडे दुर्लक्ष करण्यात आले. जिथे आग लागली, त्या ठिकाणी अग्निशमन यंत्रणाही नव्हती. आग विझविण्याची सोय असणे ही प्राथमिक बाब असूनही त्याची पूर्तता करण्यात आली नव्हती. यातून व्यवस्थेची बेफिकिरी दिसते. मुळात हा अतिदक्षता विभाग जिथे सुरू करण्यात आला, तिथे प्रारंभी तात्पुरता करोना वॉर्ड होता. तोही कोव्हिडच्या दुसऱ्या लाटेत उभारण्यात आला होता. दुसरी लाट तीव्र होती, रुग्णसंख्या झपाट्याने वाढत होती. त्यामुळे करोना वॉर्डची गरज होती. तातडीची गरज म्हणून, बांधकाम नियमांकडे काणाडोळा करून वॉर्ड उभारला. लाट ओसरल्यानंतर तिथेच अतिदक्षता विभाग सुरू करण्यात आला. त्यासाठी शहरवासीयांनी मदतनिधी दिला. या विभागासाठी वातानुकूलित यंत्रणा, तसेच प्राणवायू पुरवठा आवश्यक असते. त्यासाठीच्या वायरी, तसेच विजेच्या वायरी सदोष पद्धतीने केल्याचे निदर्शनास आणून दिल्याचे आता बोलले जात आहे. सदोष वायरिंगमुळे मोठी दुर्घटना घडू शकते, असा इशारा सार्वजनिक बांधकाम विभागाने सहा सप्टेंबरच्या पत्रात दिल्याचे समोर आले आहे. त्याकडे रुग्णालय प्रशासनाने का दुर्लक्ष केले, आगीच्या दुर्घटनेची शक्यता का विचारात घेतली गेली नाही, अग्निशमन यंत्रणा का ठेवली नाही आदी स्वाभाविक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. त्यांची उत्तरे चौकशीतून येतीलही; दोषी कोण हेही कदाचित समोर येईल; पण इतकी बेपर्वाई कशामुळे येते आणि ती कशी नाहीशी करणार हा खरा प्रश्न आहे. वेळ मारून नेणे हे आपल्या व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण आहे. दीर्घकालीन विचार करून यंत्रणा उभी करण्याऐवजी तातडीची गरज भागवण्यालाच महत्त्व दिले जाते. त्यातूनच असे अपघात सतत घडत राहतात. सार्वजनिक आरोग्याकडे कमालीचे दुर्लक्ष झाले, सरकारी रुग्णालये दुरवस्थेत आहेत याची प्रकर्षाने जाणीव झाली ती करोनाच्या साथीत. मग रुग्णालये उभरण्यापासून व्हेंटिलेटरपर्यंत आणि प्राणवायूच्या निर्मितीपासून लस विकसित करण्यापर्यंत सारे काही अचानक करावे लागले. यात अनेक अपघात झाले. कोठे अचानक ऑक्सिजनचा पुरवठा थांबला, तर कोठे रुग्णालयांना आग लागली. अनेकांच्या प्राणांची किंमत चुकवून सुविधा उभारल्या गेल्या; पण त्या ना पुरेशा आहेत, ना अपघात प्रतिबंधक आहेत! त्या त्या वेळची गरज म्हणून उभारलेल्या सुविधा भक्कम करताना सर्व प्रकारची काळजी करणे आवश्यक आहे. मात्र, त्याचाच अभाव आपल्याकडे आहे. नगरमधील रुग्णालयात नेमके हेच घडले. राज्यातील अनेक रुग्णालयांत हे घडू शकते. त्यामुळे अपघात टाळण्यासाठी गांभीर्याने पावले उचलली पाहिजेत. कुरघोडीचे राजकारण टाळून धोरणे आखली पाहिजेत आणि त्यांची अंमलबजावणी होईल हे पाहिले पाहिजे. चौकशी समिती नेमून आणि दोषींना कठोर शिक्षा देण्याचे जाहीर करून भागणार नाही. त्या पलीकडे जात रुग्णालयांत अपघात प्रतिरोधक व्यवस्था उभी करता आली, तरच अशा दुर्घटनांत आजवर बळी पडलेल्यांना खरा न्याय मिळेल.

# बोरवाडी-चाच रस्त्याच्या कामाचा शुभारंभ तसेच चाच गावदेवी मंदिर सामाजिक शेडचे आ.गोगावले यांच्या हस्ते भूमिपूजन

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव तालुका प्रमुख गजानन अधिकारी पंचायत समितीचे मा सभापती सुजित शिंदे, निजामपूर विभागातील उप तालुका प्रमुख, विभाग प्रमुख शाखा प्रमुख, पंचायत समिती सदस्य आणि लोकप्रतिनिधी शिवसैनिक व आजी माजी पदाधिकारी तसेच मुंबई सुरत वासीय यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

सदर बोरवाडी ते चाच हा रस्ता खूपच खराब झाला होता या भागातील शिवसैनिक आणि पदाधिकारी यांनी वेळोवेळी आमदार साहेबांकडे पाठपुरावा करून सदर रस्ता मंजूर करून घेतला, आणि या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ आज मान्यवरांच्या आणि शिवसैनिक यांच्या उपस्थितीत करण्यात आला,

आमदार गोगावले यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की गेली दोन वर्ष कोरोना काळात विकासकामे मंदावली होती आता परिस्थिती सुधारल्यामुळे विकास कामांना गती देण्यात येईल तसेच हा रस्ता एवढ्या निधीमध्ये पूर्ण होणार नाही त्याची मला कल्पना आहे, तसेच उर्वरित केळगण -कुंभे या रस्त्यासाठी सुद्धा लवकरच निधीची तरतूद करण्यात येईल.

पुढे गोगावले यांनी सांगितले की मुख्यमंत्री यांची जलस्वराज्य योजनेअंतर्गत घर तिथे नळ ही योजना मोठ्या प्रमाणात सुरू आहे मुख्यमंत्री महोदय यांची संकल्पना आहे की कोणतेही गाव पाण्यापासून वंचित राहू नये त्यामुळे या भागातील पाणी टंचाई असलेल्या गावांना सुद्धा ह्या योजनेचा लाभ मिळणार आहे तसेच या भागात अनेक कामे मंजूर करण्यात आलेली आहे त्या कामांचा देखील शुभारंभ लवकरच करण्यात येईल तुम्ही फक्त पाच वर्षातून एक वेळ मतदान करून शिवसेना पक्षाचे लोकप्रतिनिधी निवडून द्या मग बाकी पुढील विकास कामांची जबाबदारी आम्ही स्वीकारलेली आहे उर्वरित विकासकामांची काळजी करू नका विकास कामे आम्ही नक्कीच करणार आहोत आणि करत आहोत .आपण सर्वांनी हेवेदावे विसरून एकत्र हातात हात घालून पक्षाचे एक निष्ठेने काम करा, या भागाने पक्षावर भरभरून प्रेम केले आहे आणि ते कायम राहण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत असे गोगावले म्हणाले. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला चाच ग्रामस्थांनी आमदार गोगावले यांचे गणेश मूर्ती देऊन खास स्वागत केले तसेच कार्यक्रमाच्या शेवटी मुंबई सुरत आणि चाच बोरवाडी ग्रामस्थांनी आमदार गोगावले यांचे आभार मानले



## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघाच्यावतीने

# २१ वी राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धा


## राज्यातील सर्वात मोठया दिवाळी अंक स्पर्धेच्या प्रवेश प्रक्रियेला सुरूवात

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शैक्षिणक, सामाजिक, कला. क्रीडा, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने २१ वी राज्यस्तरीय आणि रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धा आयोजित करण्यात आली असून संपुर्ण महाराष्ट्रात नावाजलेल्या या दिवाळी अंक स्पर्धेच्या प्रवेश प्रक्रियेला सुरूवात झाली आहे.

दिवाळी अंक ही महाराष्ट्राची पूर्वापार चालत आलेली एक सांस्कतिक परंपरा आहे. ही परंपरा अखंडपणे चालू राहावी व त्यातून दर्जेदार दिवाळी अंकांची निमिर्ती व्हावी, यासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्यावतीने गेल्या २० वर्षापासून महाराष्ट्रातील सर्वात मोठया दिवाळी अंक स्पर्धेचे आयोजन करण्यात येत असून यंदा ही २१ वी स्पर्धा आहे.

राज्यस्तरीय दिवाळी अंक स्पर्धेमधील विजेत्या प्रथम क्रमाकांस ७५ हजार रुपये, व्दितीय क्रमाकांस ३५ हजार तर ततीय क्रमाकांस २० हजार रूपये तसेच आकर्षक सन्मानचिन्ह देवून सन्मानित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर या स्पर्धेतील उत्कष्ट कथेसाठी ०७



हजार रूपये, उत्कष्ट कविता व उत्कष्ट व्यंगचित्रास प्रत्येकी २५०० रूपये, उत्कृष्ट विशेषांकास ०५ हजार रूपये, उत्कृष्ठ मुखपृष्ठ ०५ हजार रुपये, त्याचबरोबर बालसाहित्याच्या सवोत्कष्ट अंकास ७५०० रूपये तसेच रायगड जिल्हयातून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांसाठी खास पारितोषिके देण्यात येणार असून यामध्ये प्रथम क्रमांकास ३० हजार रूपये, व्दितीय क्रमांकास १५ हजार रूपये आणि ततीय क्रमाकांस ७५०० रूपये, दोन उत्तेजनार्थ प्रत्येकी ०३ हजार रुपये आणि सर्व पुरस्कारप्राप्त अंकांना सन्मानचिन्हे असे बक्षिसांचे स्वरूप आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही या स्पर्धेत स्पर्धकांनी मोठया संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाभळे व संयोजक दीपक म्हात्रे यांनी केले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी दिवाळी अंकाच्या दोन प्रती १०० रूपये प्रवेश फीसह ३१ डिसेंबर २०२१ पर्यत पाठवाव्यात. दिवाळी अंक पाठविण्यासाठी व अधिक माहितीसाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, प्लॉट क्रमांक ४७५, मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड. संपर्क क्रमांक ९७६९४०९१६१ यांच्याशी संपर्क साधावा, असेही आवाहन आयोजकांनी केले आहे.

# माथेरान रेल्वेच्या शटल सेवेच्या फेऱ्यात वाढ

**दै.रायगड नगरी । माथेरान**

सुट्ट्यांच्या हंगामात माथेरान मधून दस्तुरी मोटार पार्किंग पर्यंत जाण्यासाठी माथेरान स्टेशन पासून जवळपास तीन किलोमीटर पायपीट करावी लागत असल्याने अनेकदा रेल्वेच्या शटल सेवेचा प्रवास करण्यासाठी प्रवाशांना गर्दीच्या वेळी तिकीट उपलब्ध होत नाहीत. याकामी नुकताच रेल्वेचे व्यवस्थापक शलभ गोयल यांनी माथेरान स्टेशनला धावती भेट दिली होती त्यावेळेस नगराध्यक्षा प्रेरणा सावंत आणि माजी नगराध्यक्ष अजय सावंत यांनी अन्य ग्रामस्थांसह या मार्गावर शटल सेवेच्या फेऱ्यात वाढ करावी अशी माथेरान करांच्या वतीने विनंती केली होती त्या विनंतीस अधीन राहून शलभ गोयल यांनी दि.८ नोव्हेंबर पासून या फेऱ्यात वाढ करण्याचा निर्णय घेतल्याचे येथील रेल्वेच्या सूत्रांकडून सांगण्यात आले आहे त्यामुळे स्थानिकांसह पर्यटकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

दस्तुरी नाक्याजवळ असलेल्या अमन लॉज रेल्वे स्टेशन पासून माथेरान स्टेशन पर्यंत येण्यासाठी शटल सेवा हाच एकमेव स्वस्त आणि सुरक्षित उत्तम पर्याय आहे.येणाऱ्या पर्यटकांना अन्य वाहतुकीचा अवाजवी खर्च न परवडणारा असल्याने बहुतांश पर्यटक हे याच शटल सेवेचा आधार घेतात. मागील काळात या मार्गावर शटलच्या आठ फेऱ्या उपलब्ध होत्या तर शनिवार आणि रविवारच्या दिवशी अन्य दोन फेऱ्या रेल्वेच्या माध्यमातून व्हायच्या परंतु आज दि.८ नोव्हेंबर पासून सोमवार ते रविवार या सर्व दिवशी अप डाऊन अशा दहा फेऱ्या करण्यात आल्या आहेत.

माथेरान ते अमन लॉज रेल्वे स्टेशन : सकाळी - ०८-१५ ,०९-३० ,१०-२० ,११-२५, दुपारी -१२-२० ,१३-२५ ,१४-४० ,१५-३०, संध्याकाळी-१६-२० , १७-१० अमन लॉज ते माथेरान स्टेशन शटल फेऱ्या : सकाळी --०८-४० , ०९-५५, १०-४५ , ११-५५, दुपारी -१२-४५, १४-००, १५०५, १५-५५, संध्याकाळी - १६४५, १७-३५, प्रथम श्रेणी तिकीट प्रति प्रौढ -३०५ रुपये, लहान मुले प्रति -१८० रुपये, द्वितीय श्रेणी - प्रति प्रौढास ४५ रुपये तर लहान मुले ३० रुपये प्रति

## ग्रामपंचायत सावळे

**ता. पनवेल, जि. रायगड**

**जाहीर सूचना सन २०२०/२०२१**

दिनांक : ०८/११/२०२१

ग्रामपंचायत सावळे ता.पनवेल, जि. रायगड हे ग्रामपंचायत सावळे हद्दीतील पुढील विकासकामे / साहित्य यांची अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा / कोटेशन मागवीत आहे.

| अ. क्र. | कामांचे नाव | अंदाज पत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | निविदा स्वीकारण्याची तारीख | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | एकनाथ माळी ते खत कारखाना पर्यंत साईडपट्टी करणे | ५३१७४४/- | ५३१७/- | ०९/११/२०२१ ते १६/११/२०२१ | १७/११/२०२१ |
| २ | हनुमान माळी ते खत कारखाना पर्यंत पेव्हर ब्लॉक बसविणे | ९९८८५८/- | ९९८९/- | ०९/११/२०२१ ते १६/११/२०२१ | १७/११/२०२१ |
| ३ | हनुमान माळी ते खत कारखाना आणि ंदिर परिसर भराव व कॉँक्रीट करणे, साईडपट्टी भरणे | ६४११८२/- | ६४१२/- | ०९/११/२०२१ ते १६/११/२०२१ | १७/११/२०२१ |
| ४ | नारायण कुरंगळ ते संतोष केदारी बंदीस्त गटार करणे | ९६२७३/- | ९६३/- | ०९/११/२०२१ ते १६/११/२०२१ | १७/११/२०२१ |
| ५ | वॉर्ड क्रमांक २ मधील गटारे बंदिस्त करणे | ३१३३३३/- | ३१३३/- | ०९/११/२०२१ ते १६/११/२०२१ | १७/११/२०२१ |
| ६ | केदार आळी व स्मशानभूमीत हायमास्ट बसविणे | २०००००/- प्रत्येकी | २०००/- प्रत्येकी | ०९/११/२०२१ ते १६/११/२०२१ | १७/११/२०२१ |
| ७ | ओपन जीम निर्माण करणे | कोटेशन | | ०९/११/२०२१ ते १६/११/२०२१ | १७/११/२०२१ |

१. निविदा मिळणेकरिता दि. ०९/११/२०२१ ते १६/११/२०२१ पर्यंत लेखी अर्ज सादर करणे.

२. अर्जदारांना सदर कोरे निविदा प्रपत्र दिनांक ०९/११/२०२१ ते १६/११/२०२१ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळता) ग्रामपंचायत कार्यालयात दुपारी ३ वाजेपर्यंत उपलब्ध होतील.

३. भरलेल्या सीलबंद निविदा दिनांक १६/११/२०२१ रोजी कार्यालयीन वेळेत संध्याकाळी पाच वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

४. आलेल्या निविदा दि. १७/११/२०२१ रोजी ११.३० वाजता समक्ष उघडण्यात येतील.

५. इसारा रक्कम डिमांड डाफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत सावळे यांचे नावे असावा, अथवा रोखीने.

६. मजूर ठेकेदारास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.

७. सदर कामाचे अंदाजपत्रक कार्यालयीन वेळेत पहावयास मिळेल. व अंदाजपत्रक मिळणे कामी विनंती अर्ज केल्यावर व १०० रु. भरणा केल्यानंतर मिळेल.

८. निविदा पोष्टाने पाठविली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

९. निविदा किंमत ना परतावा राहील.

१०. नियमा प्रमाणे आयकर भरावा लागेल.

११. अधिकृत ठेकेदारांनी निविदा न भरल्यास अनुभवी ठेकेदारांचा विचार केले जाईल.

१२. कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २.३३% आयकर, १% कर्मचारी विमा, ०.१५% सर चार्ज रकमा प्रत्येक बिलातून कपात केली जाईल.

१३. वर्क ऑर्डरप्रमाणे मुदतीत काम पूर्ण न झाल्यास दुसरया ठेकेदारांकडून ग्रामपंचायतीने काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस जबाबदार रहावे लागेल.

१४. झालेल्या तांत्रिक मुल्यांकना प्रमाणे व निधी उपलब्धतेनुसार देयके अदा केली जातील.

१५. निविदा मंजूर केल्यास ४ दिवसांत काम सुरु करणे बंधनकारक आहे.

१६. मंजुर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार व पंचायात देखारेखीखाली करायचे आहे.

१७, निविदा मंजूर केल्यावर रु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जमीनदार देऊन करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.

१८. सुरक्षा अनामत रक्कम अंतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील, कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणीनुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.

१९. काम पूर्ण करणे पूर्वीच्या कामाचे ठिकाणाचे फोटो व काम चालू असतानाचे फोटो आणि काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अंतिम बिले दिली जाणार नाहीत,

२०. सोबत जोडलेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करण्याचे आहे.

२१. एक किंवा सर्व निविदा / कोटेशन नामंजूर करण्याचा अधिकार सरपंच यांनी राखून ठेवला आहे.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत सावळे, ता.पनवेल,जि.रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत सावळे, ता.पनवेल,जि.रायगड**

पृष्ठ क्र.१ वरुन...

## पनवेल उरण रस्त्याला सिडकोची सावत्र वागणूक

घ्यावे अन्यथा जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल. कारण सिडकोला आणखीन किती बळी हवे आहेत? असा उद्विग्न सवाल जनता विचारू लागली आहे. अपघातात मृत्युमुखी पडणाऱ्यांच्यात दुचाकी वाहक संख्य जास्त आहे.खड्ड्यांनी व्यापलेल्या पनवेल उरण रस्त्यावरून दुचाकी वाहक जीव मुठीत घेऊन प्रवास करत असतात. धुळीच्या साम्राज्यामुळे समोरचे दिसणे जिकचे असते, श्वासाचे आजार जडतात, डोळ्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो. रस्ता नव्याने बनविणे हाच या सगळ्यावर उपाय आहे. लांबलेल्या पावसामुळे रस्त्यांची कामे हाती घेण्यास उशीर झाला आहे. परंतु पनवेल उरण राज्य मार्ग गेल्या चार वर्षांपासून दुरुस्तीच्या प्रतीक्षेत आहे.

## पनवेल शहर जिल्हा कॉंग्रेस ओबीसी सेलच्या अध्यक्षपदी वैभव पाटील

महेंद्र घरत हे वैभव पाटील यांचे राजकीय गुरू आहेत. त्यामुळे वैभव पाटील यांनी गेली २५ वर्षे जवळून राजकारण पाहिले आहे. कामगार क्षेत्रात काम करीत असताना वैभव पाटील यांनी राजकारणात येऊन समाजासाठी योगदान द्यावे यासाठीमहेंद्र घरत यांनी वैभव पाटील यांच्यावर या पदाची जबाबदारी सोपवली आहे. सध्या ओबीसी समाजाचे आरक्षण हा अत्यंत महत्वाचा व समाजातील ज्वलंत प्रश्न आहे. यासाठी सखोल अभ्यास करून ओबीसी समाजाच्या आरक्षणासंदर्भात सर्वतोपरी प्रयत्न करून योगदान दिले जाईल, असा विश्वासही वैभव पाटील यांनी यानिमित्ताने व्यक्त केला. वैभव पाटील यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## विविध मागण्यासाठी कोळी बांधवांचा निषेध मोर्चा

समुद्र किनाऱ्यावरचे सर्व कोळीवाडा उध्वस्त करुन मोठ्या प्रकल्पांना कोळीड्याच्या जागा देतात. या सर्वांना जबाबदार म्हणून स्थानिक राजकीय पुढारी आहेत. ह्यामुळे सर्वांत मोठा लोकशाहीचा घात होत आहे. असे वरळी गावातील ग्रामस्थ शरद वासूदेव कोळी, सागर वराळीकर, प्रणालीताई कोळी, मनालीताई वरळीकर यांनी प्रतिक्रिया दिल्या.यावेळी मंगेश कोळी, नरेश कोळी आदी उरण तालुक्यातील अनेक मच्छिमार, कोळी बांधव उपस्थित होते.

## इ-कॉमर्स मार्केटींगमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून सव्वातीन लाखांचा गंडा

आले. मात्र दुसऱ्या दिवशी त्रिदिवेष हे किराणा सामानाचे बील ऑनलाईन भरायला गेले असता त्यांच्या लक्षात आले की त्यांच्या बँकेच्या दोन्ही खात्यातून ३ लाख २५ हजार ४०० रूपये काढण्यात आले. त्यामुळे आपली मोठी फसवणूक झाली असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी या बाबत न्हावाशेवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. वरिष्ठ पोलिस निरिक्षक मधुकर भटे यांच्या मार्गदर्शनाखाली न्हावाशेवा पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## मुरुडमध्ये एस.टी.कर्मचाऱ्यांचा शंभर टक्के बंद

विभाग नियंत्रक यांना एक निवेदन सादर करण्यात आले असून दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना शासनाच्या इतर खात्याच्या तुलनेत कमी व तुटपुंजे वेतन देण्यात येऊन अन्याय होत आहे. दिलेल्या वेतनातून मूलभूत गरजा भागविणे सुद्धा कठीण झाल्याने कर्मचारी कर्जबाजारी झालेला आहे. अनेक विभागातील आपल्या काही कर्मचाऱ्यांनी आत्महत्येचे पाऊल उचलले आहे. आतापर्यंत ३४ जणांनी आत्महत्या केल्या आहेत व अजूनही करीत आहेत.

रा.प.महामंडळाचे राज्य शासनात विलिनीकरण करून सर्व वेतन व भत्ते इतर सवलती राज्य शासन नियमाप्रमाणे त्वरीत देण्यात यावेत. यासाठी आम्ही मुरुड आगारातील सर्व कर्मचारी दि.७ नोव्हेंबर २०२१ मध्यरात्री पासून बेमुदत कामबंद आंदोलनात सहभागी होत असल्याचे निवेदनात म्हटले असून सदर निवेदनाच्या प्रती खासदार सुनील तटकरे, रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे, अलिबाग-मुरुड मतदार संघाचे आमदार महेंद्रशेठ दळवी, मुरुड तहसीलदार, पोलीस निरीक्षक व नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा यांना देण्यात आल्या आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## गडकिल्ले स्पर्धेच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे दर्शन

**दै.रायगड नगरी । उरण**

दिवाळीच्या सणात रायगड जिल्ह्यात तसेच कोकणात गडकिल्लयांच्या स्पर्धा आयोजित करण्यात येतात. या गडकिल्लयांच्या स्पर्धेच्या माध्यमातून श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा जतन करण्याचे महत्त्वाचे काम होत असून भारतीय संस्कृतीचे संरक्षण, संवर्धन या स्पर्धेतून होत असते अशा या उपक्रमाचे आयोजन सर्वत्र व्हायला हवे असे मत छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील यांनी व्यक्त केले आहे.श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेतर्फे उरण तालुकास्तरीय गड किल्ले स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. संस्थेच्या या उपक्रमाद्वारे पदाधिकाऱ्यांनी विविध ठिकाणच्या गड किल्लयांना भेट दिली.

प्रथम क्रमांक –अमर रघुनाथ ठाकुर (प्रतापगड) चिरनेर यांना संस्थेचे सचिव प्रेम म्हात्रे यांच्या हस्ते, द्वितीय क्रमांक–कुणाल ढेमरे व टीम यांना संस्थेचे सदस्य सुरज पवार यांच्या हस्ते, तृतीय क्रमांक –निळ सुशांत म्हात्रे (मु.सारडे) यांना संस्थेचे सदस्य हेमंत ठाकूर यांच्या हस्ते, उत्तेजनार्थ –हर्षिता म्हात्रे (गोवठणे) यांना संस्थेचे सदस्य सुविध म्हात्रे यांच्या हस्ते, उत्तेजनार्थ – विघ्नेश विष्णू म्हात्रे (पिरकोन) यांना संस्थेचे सदस्य आकाश पवार यांच्या हस्ते या स्पर्धेतील विजयी उमेदवारांना बक्षीस देण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, कार्याध्यक्ष विठ्ठल ममताबादे, सदस्य माधव म्हात्रे आदी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते. श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. सदर गड किल्ले स्पर्धांच्या या कार्यक्रमाचे अनेक नागरिकांनी, सामाजिक संस्थांनी कौतुक केले आहे.

## गड-किल्ले स्पर्धेतील विजेत्यांचा सन्मान

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

श्री.आदिनाथ सामाजिक संस्था धानकान्हे रोहा यांच्या वतीने दीपावली सणाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या गड–किल्ले स्पर्धेतील विजेत्यांचा पारितोषिके देऊन सन्मान करण्यात आला आहे.

विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या श्री. आदिनाथ सामाजिक संस्था धानकान्हे यांच्या वतीने प्रथमच गड–किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत प्रथम क्र. रोहन गोसावी,सार्थक गोसावी, द्वितीय क्र. अरव कचरे,तुतीय क्र.राज नवघरे,अथर्व नवघरे,चतुर्थ क्र.दिशांत नवघरे यांनी पटाकावले.स्पर्धेतील विजेत्यांना व सहभागी स्पर्धकांना सेवानिवृत्त वनपाल शंकर धनावडे व जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सखाराम कचरे व ग्रा. पं.सदस्य पूजा गोसावी यांच्या शुभहस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी अध्यक्ष पांडुरंग गोसावी,उपाध्यक्ष संजय गोसावी,सचिव संतोष गोसावी, खजिनदार विनायक गोसावी,चंदू गोसावी, दीपक नवघरे,सहदेव गोसावी,शिवाजी कचरे, रमेश जाधव,ज्ञानेश्वर तुपकर,जनार्दन गोसावी,सविता गोसावी, ज्योत्स्धना बाईत आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.


मा.श्री.मुजावर सो.कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
श्री.विशाल अनंत मुंडकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.१५५०/२०२१
नि.नं.८
ने.ता.१५/१२/२०२१

१) श्रीमती.कुसूम भास्कर खर्डे
वय : ७४ वर्षे, धंदा : घरकाम
२) श्री.सुनील भास्कर खर्डे
वय : ५० वर्षे, धंदा : शेती
३) सौ.पुनम जितेंद्र कासकर
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
अर्जदार क्र.१ ते ३ सर्व
रा.पांडुरंग रामले मार्ग, हिंगळा देवी मंदिराजवळ,
वर्सोवा, अंधेरी वेस्ट, मुंबई–४०००६१
४) सौ.संध्या राजेंद्र जोंचा
वय : ४० वर्षे, धंदा : गृहिणी
अर्ज क्र.४ रा.जोंचा हाऊस, मनीबाई निवास,
मांडवी गल्ली, फेरी रोड, पोलीस चौकी जवळ,
अंधेरी वेस्ट, मुंबई–४०००६१ अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की,

१) सदर अर्जदार नं.१ ही अर्जदार क्र.२ ते ४ यांची आई असून अर्जदार क्र.२ ते ४ हे एकमेकांचे सख्खे भाऊ–बहिण आहेत. सदर अर्जदार क्र.१ यांचे पती म्हणजेच अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील भास्कर रामा खर्डे हे दि.२१/०२/२०१६ रोजी वर्सोवा, मुंबई येथे मयत झाले आहेत. सदर मयत भास्कर रामा खर्डे यांच्या वडिलोपार्जित सामाईक मालकीची मौजे : गव्हाण, ता.पनवेल येथील जमीन मिळकत महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लिमिटेड यांनी ''नवी मुंबई'' प्रकल्पाकरिता संपादीत केली आहे. सदर मिळकतीच्या संपादनासंबंधी खालीलप्रमाणे ॲवॉर्ड जाहीर करण्यात आले आहे.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील**

| अनु क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | गव्हाण–७८८ | ३७ | १३ | ०–०३.५ | ०–२८ |
| | | ३७ | ६ | ०–०२.८ | ०–३ |
| | | ३६ | ४ | ०–००.५ | ०–०३ |
| | | ३६ | ३ | ०–०५.० | ०–१३ |

आता शासनाने जाहीर केलेल्या साडेबारा टक्के भूखंड योजनेंतर्गत सदर मयत भास्कर रामा खर्डे यांस त्यांच्या वरील मिळकतीचे संपादनापोटी मिळणारा भूखंड सदर अर्जदारांस मिळणेकरिता त्यांनी ते मयत भास्कर रामा खर्डे यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.८ माहे नोव्हेंबर सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण


# अखेर भानंग गावातील पाणीपुरवठ्याच्या कामास सुरूवात ; शिवसेनेच्या पाठपुराव्याला यश

**दै.रायगड नगरी । तळा**

तालुक्यातील भानंग गावातील गेल्या तीस वर्षांपासून रखडलेल्या पाणी पुरवठ्याच्या कामास रविवार (ता.७) रोजी सुरुवात झाली आहे. याबद्दल ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.या रस्त्याच्या कामाचे अंदाजपत्रक व निविदा शिवसेनेच्या पाठपुराव्यामुळे मंजूर होऊन कार्यारंभ आदेश दिलेले असताना राष्ट्रवादी कँग्रेस कडून या कामाचे भूमिपूजन करण्यात आले होते राष्ट्रवादी काँग्रेसने केलेले भूमिपूजन ही केवळ ग्रामस्थांची केलेली दिशाभूल होती. या कामाचा शुभारंभ शिवसेनेकडून केला जाईल असा शब्द शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख अनिल नवगणे यांनी दिला होता त्या शब्दाला जागून त्यांनी आज ५४ लाख भानंग पाणीपुरवठा योजनेच्या कामाची सुरवात श्रीफळ वाढवून केली.




याकामी ही पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर पूर्ण करून ग्रामस्थांची अडचण दूर होण्यासाठी शिवसेना तळा तालुका प्रमुख प्रदुम्न ठसाळ हे लोकप्रतिनिधींकडे सातत्याने पाठपुरावा करित होते. त्यांच्या या लढ्यास अखेर यश आले आले. या पाणीपुरवठा योजनेचे काम मार्गी लावत असताना मात्र सातत्याने काहीतरी अडचणी निर्माण होऊन ते सुरू होत नव्हते.

अखेर अलिबाग विधानसभेचे शिवसे–नेचे लोकप्रिय आ. महेंद्रशेठ दळवी यांनी या विषयामध्ये लक्ष घातले व जिल्हा परिषद मुख्याधिकारी पाणीपुरवठा विभागाची यंत्रणा व संबंधित अधिकारी यांच्यांत समन्वय घडवून आणला. यासाठी सर्वांनी सकारात्मक भूमिका घेतल्याने अखेर रविवारी रायगड जिल्हा प्रमुख अनिल नवगणे यांच्या हस्ते व तालुका प्रमुख प्रदुम्न ठसाळ, भानंग ग्रामपंचायत सरपंच रघुनाथ वाघरे, उपरपंच सुहानी भौड, माजी सरपंच नाना दळवी यांच्या प्रमुख उपस्थितीत या कामाचा शुभारंभ झाला.यावेळी शहर प्रमुख राकेश वडके, उपतालुकाप्रमुख शरद सारगे, काकडशेत मुंबई संपर्क विभागप्रमुख दिनेश रामाणे उपविभागप्रमुख संतोष वाघरे, शाखाप्रमुख सुरेश धाडवे, ग्रामपंचायत सदस्या सुलोचनाताई रेवाळे, जेष्ठ शिवसैनिक यशवंत वाघरे, पांडुरंग वाघरे, मधुकर शिगवण, महादेव वाघरे, राजेश रेवाळे, शांताराम पवार, अनिल रेवाळे,सुधाकर शिगवण, वसंत वाघरे, नमित पांढरकामे, नगरसेवक चेतन चव्हाण, विठोबा चांडीवकर ,लीलाधर खातू , तसेच समस्त भानंग ग्रामस्थ, मुंबईकर,महिला मंडळ आणि तमाम शिवसैनिक, युवासैनिक उपस्थित तसेच परिसरातील बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

ग्रामीण पाणीपुरवठा जल जीवन मिशन अंतर्गत तळा तालुक्यातील भानंग गावासाठी ५४ लक्ष अंदाज पत्रकीय रक्कम पाणी पुरवठा योजनेसाठी मंजूर करण्यात आली आहे.या कामाचे एकाच दिवशी शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून भूमिपूजन करण्यात आले होते राज्यात महाआघाडीचे सरकार असेल तरी स्थानिक पातळीवरील नेत्यांमध्ये विस्तव सुध्दा जात नाही राष्ट्रवादीचा प्रत्येक नेता भानंग पाणीपुरवठा योजना मीच मंजूर करून आणली असा दावा करत होते पण यावर शिवसेनेने मात करून रविवारी या कामाची सुरवात करून हे काम शिवसेनेकडून मंजूर झाले असल्यावर शिकामोर्तब केले असल्याचे बोले जात आहे.

# भव्य किल्ले स्पर्धा २०२१ स्पर्धेचे पारितोषिक वितरण संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता युवा मोर्चा पनवेल शहरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दीपावली निमित्त 'भव्य किल्ले स्पर्धा २०२१' चे पारितोषिक वितरण संपन्न झाले. या स्पर्धेत प्रथम पारितोषिक नवीन पनवेल येथील राजे शिवराय प्रतिष्ठानने प्रथम, रामश्री मित्र मंडळाने द्वितीय, तर कट्टा गँग पनवेलने तृतीय क्रमांक पटकाविला. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सर्व विजेत्यांना सन्मानित करण्यात आले.




दरवर्षीप्रमाणे यंदाही युवा मोर्चाच्यावतीने भव्य किल्ले स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यंदा या स्पर्धेचे तिसरे वर्ष आहे. या स्पर्धेतील प्रथम क्रमांकाचे पारितोषिक ०७ हजार रुपये तर द्वितीय व तृतीय अनुक्रमे ०५ हजार व ०३ हजार रुपये असे होते. या स्पर्धेतील एकूण विजेत्यांना ४५ हजार रुपयांची पारितोषिके व आकर्षक चषकने सन्मानित करण्यात आले.

यावेळी पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे शहर सरचिटणीस नगरसेवक नितीन पाटील, नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, शहर अध्यक्ष रोहित जगताप, गौरव कांडपिळे, उदित नाईक, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

– 'भव्य किल्ले स्पर्धा २०२१' निकाल– प्रथम क्रमांक (०७ हजार रुपये)– राजे शिवराय प्रतिष्ठान, द्वितीय क्रमांक (०५ हजार रुपये)– रामश्री मित्र मंडळ, तृतीय क्रमांक (०३ हजार रुपये)– कट्टा गँग

उतेजनार्थ (प्रत्येकी ०२ हजार रुपये)– जागृत पाटील, अमित कापरे, वरद क्षिरसागर, सार्थक जगे, महेंद्र उनाडकत, नितेश जाधव, अयुष रॉय, तनिश, निखिल काथारा, सूरज मोकाशी.

उतेजनार्थ (प्रत्येकी ०१ हजार रुपये)– विनय इनामदार, पिंटू वर्मा, बालग्राम, अक्षय वाडेकर, कोळशेवर, आर्यन काटे, विनायक पनवेलकर, अभिमन्यू शक्का, श्रीनाथ गायकवाड, मधीशा पाटील.

# शिवप्रेमी युवा प्रतिष्ठान मार्फत गडकिल्ले स्पर्धा उत्साहात संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

दिपावली निमित्ताने उरण तालुक्यातील चिरनेर येथे धाकटे भोम व मोठे भोम गाव मर्यादीत गडकिल्ले स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. स्पर्धेतील विजयी उमेदवारांना शिव प्रेमी युवा प्रतिष्ठानच्या वतीने सन्माचिन्ह व प्रमाणपत्र देण्यात आले. तसेच जे स्पर्धक स्पर्धेमध्ये सहभागी झाले त्यांना शिवप्रेमी युवा प्रतिष्ठानच्या वतिने प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

श्री विठ्ठल रखुमाई मंदिर धाकटे भोम येथे सदर कार्यक्रम संपन्न झाला. शिवप्रेमी युवा प्रतिष्ठान आयोजित दिवाळी किल्ले स्पर्धा या स्पर्धे मध्ये प्रथम क्रमांक कु आर्यन/ प्रणव केणी तर द्वितिय क्रमांक कु.प्राची व प्रिया रमेश गोंधळी व तृतीय क्रमांक कु.कार्तिक मधुकर म्हात्रे यांचा आला. त्यांना प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देण्यात आले.तसेच या बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमास शिवधन पतपेढी चेअरमन गणेश बाबुराव म्हात्रे, चिरनेर ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच श्रीधर मारुती पाटील, चिरनेर ग्रामपंचायत सदस्य धर्मेंद्र बाबुराव म्हात्रे, जनसागर पतसंस्था (मुंबई) चे माजी संचालक सुभाष पाटील, मनोज पाटील, सुरेश पाटील, महेश पाटील तसेच पदाधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

# माथेरानमध्ये पावसाची हजेरीने हवेत गारवा पर्यटकांमध्ये आनंद

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मागील दोन दिवसांपासून माथेरानच्या वातावरणात कमालीचा बदल झाला असून कालपासून ढगाळ वातावरण व पावसाच्या हजेरीने कमालीचा गारवा जाणवू लागला आहे.

काल सायंकाळी पावसाने हजेरी लावल्याने माथेरान बाजारपेठेत पर्यटन रिमझिम पडणाऱ्या पावसाचा आनंद घेताना आढळून येत होते तर आज सकाळपासूनच वातावरण ढगाळ होते व दुपार नंतर ढगांचा कडकडाट सुरू झाला होता व संध्याकाळ सुरू होताच रिमझिम पावसास सुरवात झाली व हवेत कमालीचा गारवा जाणवू लागला होता व सर्वत्र अचानक धुके आले होते, दिवाळी सुट्ट्यांसाठी माथेरानमध्ये आलेल्या पर्यटकांसाठी हा वेगळाच अनुभव होता त्यामुळे पर्यटकांमध्ये ही खुशीची लहर दिसत होती.

मागील काही दिवसांपासून परतीचा पाऊस व ढगाळ वातावरण आहे. अशा वेळी पर्यटक खरेदीसाठी बाहेर पडत नाहीत. व्यापारी व दुकानदारांनी दिवाळीचा लाखो रुपयांचा माल भरुन ठेवला आहे. परंतू ग्राहक नसल्याने ऐन दिवाळीत आज पावसामुळे काही मिनिटातच बाजारपेठेत शुकशुकाट झाला होता.


**जाहीर नोटीस**

तमाम सर्व लोकांस व विशेषतः वडघर पनवेल महानगरपालिका / सिडको हद्दीतील मौजे : वडघर, तालुका : पनवेल, जि.रायगड परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारा कळविण्यात येते की, मौजे : वडघर, तालुका : पनवेल, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत आमचे अशिलांनी विद्यमान मालक श्री.अरुण रामदास नाईक, श्रीमती.गंगा रामदास नाईक, श्रीमती.निरा सत्या नाईक, श्रीमती.गीता सत्या नाईक, श्रीमती.सुवर्णा नितेश वाघे, श्रीमती.दुर्गा काल्या नाईक, श्रीमती.संगीत्या काल्या नाईक, श्रीमती.भिमा मोतीराम नाईक रा.मु.वडघर, ता.पनवेल, जि.रायगड ह्यांना सिडकोकडून मिळणारा भूखंड कायम खरेदी खताने विकत घेत आहेत. उपरोक्त मिळकतीचे संदर्भात कोणाचाही, कसल्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षिस, लीन, लीज, विसारपावती, कुलमुखत्यारपत्र, खरेदीखत, कुळ, खंड, अदलाबदलपत्र, साठेकरार, असाइनमेंट, पोटगी अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध, वाद, दावा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत आपले लेखी पुरावे, म्हणणे अथवा कागदपत्रे आमच्या खालील पत्यावर आणून समक्ष दाखवून आमची खात्री पटवून द्यावी. मुदतीत हरकत अथवा तक्रार न आल्यास त्यांनी तो हक्क जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणचीही तक्रार व सबब चालणार नाही. कोणाचेही नुकसान होवू नये म्हणून ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली आहे. परिशिष्ट मिळकतीचे वर्णन : मौजे : वडघर, तालुका : पनवेल, जि.रायगड मे.दुय्यम निबंधक साहेब पनवेल यांचे व पनवेल महानगरपालिका / सिडको हद्दीतील

**फाईल नं.७१५ करंजाडे, करंजाडे नोड,**
**क्षेत्र १०५० चौ.मी., ता.पनवेल, जि.रायगड**

सदर मिळकतीच्या कायम खरेदी खताच्या संदर्भ हा ह्या जाहीर नोटीसीचा विषय असे.

कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
दिनांक : ०८/११/२०२१

**सही/–**
**ॲड.श्री.सुधीर एस.म्हात्रे, ॲड.कल्याणी सुधीर म्हात्रे**
**ॲडव्होकेट ऑफिस नं.०६, तळमजला, त्रिमुर्ती इनक्लेव सोसायटी, सेक्टर ९, कामोठे, पनवेल**
**मोबाईल नं.९६६४०९८३४७/९०८२३३८३१५**



अर्जदारतर्फे वकील
श्री.पराग दत्तात्रय म्हात्रे

**जाहीर नोटीस**

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज ३४३/२०१८
नि.नं.१०/ड
ने.ता.१८/११/२०२१

श्री.नारायण महादेव म्हात्रे, वगैरे अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, कै.गुलाब महादेव म्हात्रे यांचे दि.१६/०७/२०१८ रोजी मुळेखंड, ता.उरण, जि.रायगड येथे निधन झाले आहे. त्यास वारस असलेबाबत दाखला मिळणेकरिता १) श्री.नारायण महादेव म्हात्रे, २) श्री.प्रभाकर महादेव म्हात्रे यांनी मे.दिवाणी न्यायालय, उरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**मौजे : चाणजे, तालुका : उरण, जिल्हा : रायगड**

| अनु क्र. | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | चाणजे १९५ | २०८ | ८ | ०–०८–० | १.८१ |
| २ | चाणजे १९५ | २३१ | ३ | ०–०८–० | १.७५ |
| ३ | चाणजे १९५ | २४० | २ | ०–३७–७ | ४.४४ |
| ४ | चाणजे २१ | २३९ | २ | ०–३९–१२ | १६.५६ |

त्यांचे वारसाबाबत, कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्याने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष अथवा वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास हे मे.कोर्ट कै.गुलाब महादेव म्हात्रे यांचे वारसदार आहेत असे वारस असल्याबाबत त्यांना हा वारस दाखला मंजूर करेल.

आज दि.३०/१०/२०२१ रोजी मे.कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी देण्यात आली.

सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल १) श्रीमती.संगीता जितेंद्र पाटील रा.ए.एल ६/५/१, सेक्टर ५, जवळ सिद्धीविनायक मंदिर, ऐरोली मुंबई–४००७०८. खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुलमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांनी आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमूद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मौजे : तांबस, तलाठी सजा तमनाथ ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| १) भगवान नारायण गोळेकर | १२ | ८ | ०–९४–०० पैकी ०–१८–०० | १ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
**कार्यालयीन पत्ता : मु.उक्रुळ, पो.चिंचवली, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१**

**सही/–**
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
**दि.०९/११/२०२१**
**मो.नं.९०२८९८२२७७**



**जाहीर नोटीस**

आमच्या अशिलांनी श्री.प्रफुल्ल वामन जगताप, पत्ता : डी.एस.के. वुदावनम सदनिका नं.एफ/२०१, फेज २, मॉडेल कॉलनी, शिवाजी नगर पुणे ४११०१६ यांच्या ताबेकब्जात असलेली त्यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकत

**सदर मिळकतीचे वर्णन**
**मौजे : निगडोली, ता.खालापूर, जि.रायगड**

| मौजे | भूधारणा पद्धती | सर्व्हे नं. | क्षेत्र | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| निगडोली ता.खालापूर, जि.रायगड | वर्ग १ | ३५/२ | ०–३०–०० | ०.२० |

तरी वरील मिळकती बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा–कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क–हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री करण्याचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०८/११/२०२१

**सही/–**
**ॲड.अजित धनराज म्हात्रे**
**तळमजला, दत्ताचार्य अपार्टमेंट, पायोनिअर सोसायटी, स्वामी नित्यानंद मार्ग, युविका हॉटेल शेजारी, पनवेल–४१०२०६**
**मो.नं.८१६९८४७७०७**



**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या मालकीच्या खालील शेतजमीन मिळकतीच्या विक्री संदर्भात श्री.मुकेश केशूभाई शोमर पत्ता : प्रथक प्लॉट नं.७२, रिंग रोड नं.३, सेक्टर २१, नेरुळ, नवी मुंबई यांचेबरोबर समझोता करार दि.२४ जानेवारी २०२१ रोजी झाला होता.

**सदर मिळकतीचे वर्णन**
**मौजे : तळोजे मजकूर, ता.पनवेल, जि.रायगड**

| अ. क्र. | गट क्र. | हि.क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|
| १ | १०५ | ४ | लागवड योग्य ००–२६–९० पोटखराबा ००–०२–२० एकूण ००–२९–१० | ३.०६ |
| २ | १०६ | १ | ००–०४–०० | ०.०६ |

सदर समझोता करारातील अटी व शर्तीनुसार श्री.मुकेश केशूभाई शोमर यांनी योग्य मुदतीमध्ये विक्री व्यवहार पूर्ण करणे अपेक्षित होते. मात्र सदर श्री.मुकेश केशूभाई शोमर हे समझोता करार झाल्यापासून आजपर्यंत आमचे अशिलांना भेटलेले नाहीत, किंवा कोणत्याही प्रकारे आमचे अशिलांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला नाही. आमचे अशिलांचे श्री.मुकेश यांना भेटण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले म्हणूनच आमचे अशिलांनी दि.३०/१०/२०२१ रोजीची नोटीस मुकेश केशूभाई शोमर यांनी समझोता करारात नमूद कलेल्या पत्यावर पाठवली असता, ती **''दिलेल्या पत्यावर या नावाची व्यक्ती राहत नाही चौकशी अंती परत''** या शेऱ्याने दि.८/११/२०२१ रोजी परत आली आहे.

तरी या जाहीर नोटीशीने श्री.मुकेश केशूभाई शोमर यांस तसेच त्यांचे वालीवारस, असाईनीज, ॲडमिनीस्टर्स, यांस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दि.२४/०१/२०२१ रोजीचा श्री.मुकेश केशूभाई शोमर यांच्याशी केलेला समझोता करार कायमस्वरुपी रद्द केलेला असून येथून पुढे सदर मिळकतीशी श्री.मुकेश केशूभाई शोमर यांचा काहीही संबंध नसल्याने आमचे अशिल सदर मिळकत विक्री करण्यासंदर्भात अन्य इसमांबरोबर आवश्यक तो व्यवहार करतील हे सर्वांस कळावे.

दि.०९/११/२०२१

**सही/–**
**ॲड.सचिन पुंडलिक केणी**
**शॉप क्र.१४, अशियाना को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.क्र.१०७ ए, जुने पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९९२०९७३४६७**

# संक्षिप्त...

## कोकण विभागीय लोकशाही दिनी १५ तक्रारी दाखल

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

कोंकण विभागीय लोकशाही दिन आज कोंकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य) श्री.मनोज रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. यावेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयाकडे पाठविण्यात आली.

यावेळीविभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोंकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या ४१ असून आज निकाली काढण्यात आलेल्या अर्जांची संख्या ०६ तर आज आलेल्या अर्जांची संख्या १५ असून एकूण ३५ तक्रारी प्रलंबित आहेत.

## ५ लाखाचे दागिने लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

५ लाखाचे दागिने लंपास केल्याची घटना कामोठे वसाहतीमध्ये घडली आहे.

कामोठे वसाहतीमधील सेक्टर ८ येथील बेस्ट एम्प्लॉईज रायगड सोसायटीमध्ये महेंद्र कोंडाजी हे आपल्या कुटुंबियांसह राहतात. त्यांनी लक्ष्मी पुजनानिमित्त आपले सर्व दागिने बाहेर काढून हॉल लगत असलेल्या देव-घरात पुजनासाठी ठेवले होते. सदर पुजनानंतर ते दागिने देवाऱ्यात होते. दरम्यानच्या काळात अज्ञात इसमाने घरात प्रवेश करून सदर दागिने लंपास केल्याने याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## दिंडी पालख्यांना प्रारंभ

**दै.रायगड नगरी । उरण**

मागील पावणेदोन वर्षे कोरोना संसर्गजन्य विषाणूच्या व्हायरसने हादरून निघालेल्या नागरिकांनी आत्ता देवस्थानाच्या निमित्ताने सहलीतून मोकळा श्वास घेण्याला प्रारंभ केला असून, उरण तालुक्यातील साई द्रोणागिरी पदयात्रा मंडळ करंजा यांनी शंभर साई भक्तांनी काल सकाळी ९ : ०० वाजता पदयात्रा साई पालखी व दिंडीने बेलापूर मार्गे कसारा घाटातून साईंच्या शिर्डी मुक्कामी जाण्यासाठी प्रस्थान केले आहे. जागोजागी या साई पालखी व दिंडीचे स्वागत होत आहे.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# साहित्यसंपदा समूहाचा तृतीय वर्धापनदिन उत्साहात संपन्न

## सीमा हरकरे आणि शशिकांत पाटणकर साहित्यसंपदा भूषण पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । वाकण**




विश्वविक्रमी काव्यसंमेलनाचे नियोजन ,राष्ट्रीय विक्रम प्राप्त प्रकाशन सोहळा आणि अनेक विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांनी नावाजलेल्या साहित्यसंपदा समूहाचा तृतीय वर्धापनदिन नुकताच पार पडला. पोयनाड- रायगड येथील संपर्क बालग्राम येथे आयोजित पडलेल्या वर्धापनदिनास जेष्ठ साहित्यिक गझलकार ए के शेख ह्यांची प्रमुख उपस्थिती लाभली. रिलायन्स नागोठणेचे जनसंपर्क अधिकारी, साहित्यिक रमेश धनावडे यांनी निमंत्रित म्हणून सदर प्रसंगी उपस्थित राहून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरवात पारंपरिक पद्धतीने झाली. जीविता पाटील ह्यांनी कार्यक्रमाचे निवेदन करताना उपस्थित मान्यवरांची ओळख करून दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक साहित्यसंपदा संस्थापक वैभव धनावडे यानी करताना, साहित्यसंपदेच्या वाटचालीचा आढावा घेतला. मराठी भाषा आणि संस्कृती संवर्धनासाठी साहित्यसंपदा अविरत कार्य करत राहील असा विश्वास त्यांनी बोलून दाखवला.

जेष्ठ साहित्यिक ए के शेख यांनी मराठी भाषेचा अभ्यास मुलांनी करावा व मराठी भाषेत मुलांनी जास्तीत लिखाण करावे असे सांगताना त्यांनी त्यांच्या आनंदवनात म्हटल्या जाणाऱ्या प्रार्थनेने मुलांना खिळवून ठेवले. आपल्या खुमासदार बोलण्यातून त्यांनी मुलांना लिख-ाणावर मार्गदर्शन करताना काही बालकविता आणि गझल सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. आई वडीलांच्या सन्माना सोबत शिक्षकांचाही आदर मुलांनी करायलाच हवा असे त्यांनी मत व्यक्त केले. सदर कार्यक्रमात साहित्यसंपदातर्फे शिक्षण क्षेत्रात महत्वाचे योगदान देणाऱ्या व्यक्तींचा कार्यगौरव करण्यात आला. रमेश धनावडे यांनी सर्व पुरस्कारप्राप्त शिक्षकांना शुभेच्छा देताना काळानुरूप बदललेल्या शिक्षण पद्धतीवर भाष्य केले तसेच संपर्क बालग्रामधिल मुलांना मार्गदर्शन केले. रायगड मधील निवृत्त शिक्षक रामचंद्र लोकरे, अनंत देवघरकर तसेच शिक्षण क्षेत्रात सद्य स्थितीत नवीन नवीन उपक्रम राबविणारे हनुमंत देशमुख, कुंदा झोपे आणि नीलिमा बेडसे घायवट यांना शिक्षक रत्न पुरस्कार बहाल करण्यात आला. साहित्यसंपदा दैनंदिन उपक्रमात विशेष योगदान देणाऱ्या सीमा हरकरे आणि शशिकांत पाटणकर यांचा सत्कार, साहित्यसंपदा भूषण पुरस्काराने यावेळी करण्यात आला. सामाजिक कार्यकर्ते लेखक किरण बोरकर, गझलकार रवींद्र सोनावणे, पत्रकार जीवन पाटील, ग्रामीण कथाकार लालसिंग वैराट, कवयित्री सलोनी बोरकर, पत्रकार लेखक श्रीनिवास गडकरी, कवयित्री स्मिता हर्डीकर, कवयित्री सीमा पाटील, ऋचा नीलिमा आणि रायगड मधील कवी दिलीप मोकल, कवियत्री सिद्धी गुंड, संकल्प बालग्रामचे व्यवस्थापक वैभव कुंभार आदी उपस्थित होते. मुलांना मराठी साहित्याची गोडी निर्माण होऊन त्यांना लिहते करावे ह्या उद्देशाने पार पडलेल्या कार्यक्रमात काही अनाथ मुलांनी आपल्या स्वलिखित कविता सुद्धा सादर करून आपल्या प्रतिभेची चुणूक दाखवली. सातत्यपूर्ण नव नवीन उपक्रम राबिवणाऱ्या साहित्यसंपदा समूहाच्या तिसऱ्या वर्धापन दिनानिमित्त समूहावर कौतुकाचा वर्षाव होत असून, भावी पिढ्या सशक्त करण्याचे काम कौतुकास्पदरित्या पार पडले जात आहे असे सर्वत्र मत व्यक्त होताना दिसत आहे. साहित्यसंपदातर्फे तीन वर्षाच्या कार्यपद्धतीची चित्रफीत साहित्यसंपदा डिजिटल पर्व ह्या यु ट्यूब चॅनेलच्या माध्यमातून प्रकाशित केली गेली आहे. साहित्यिक, सामाजिक उपक्रम राबविताना वेळोवेळी मदत करणाऱ्या सदस्यांचे आभार कार्यक्रमाच्या शेवटी मानण्यात आले.

# उरणचा पिरवाडी समुद्रकिनारा पर्यटकांसाठी पर्वणी

**दै.रायगड नगरी । उरण**

मुंबईच्या हाकेच्या अंतरावर असण-ारा उरणचा पिरवाडी समुद्र किनारा हा पर्यटकांसाठी पर्वणी ठरत आहे. मुंबईतील समुद्र किनाऱ्यावरील बीच हे गर्दीच्या ठिकाणी आहेत. त्यामुळे तेथील समुद्र किनारे सोडले तर पर्यटकांना उरण पिरवाडी समुद्र किनारा हा जवळचा आहे. त्यामुळे या नवीमुंबई, ठाणे, पनवेल, कल्याण, डोंबिवली, कर्जत, खोपोली, या परिसरातील तसेच स्थानिक उरण परिसरातील जनता पर्यटनाससाठी येत आहेत.



उरणला तसे चारी बाजूने समुद्राने वेढलेले आहे. परंतु पिरवाडी समुद्र किनारा हा निसर्गसंपन्न डोंगर कुशीत आहे.समोरच पूर्वेला द्रोणागिरी हा भला मोठा डोंगर उभा आहे. आजूबाजूला परिसरही गर्द झाडीने भरलेला आहे. तसेच समुद्राचे पाणी ही नितळ असल्याने पर्यटक आपला आनंद पाण्यामध्ये मनमुराद पणे तुटत आहे लहान मुले तसेच मोठी मंडळी ही वाळू मध्ये खेळण्याचा आनंद लुटत आहेत मन मोकळे पणाने आनंद लुटण्यास मिळत असल्याने पर्यटकांचा ओढा या उरणच्या पिरवाडी समुद्रावरील बीच कडे वाढत आहे.

सद्यस्थितीत या उरणच्या पिरवाडी बीच कडे पर्यटकांचा ओढा वाढत असताना इथे ज्या पद्धतीने विकास व्हायला पाहिजे तसा विकास झालेले नाही बीच कडे दुर्लक्ष झालेले आहे. काही ठिकाणी घाणीचे साम्राज्य आहे. या बाबींकडे जर शासनाने लक्ष केंद्रित केले तर हा पिरवाडी समुद्रकिनारा जर सुसज्ञ बनविला तर आणखी पर्यटकांचा ओढा या समुद्रकिनाऱ्यावर वाढला जाऊन स्थानिकांना रोजगार ही उप-लब्ध होऊन आणखी कुटुंब यावरती चालतील त्यामुळे शासनाने याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे.

# केदार भगत मित्र मंडळातर्फे दीपोत्सव

## अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांचा परिसर उजळला



**दै.रायगड नगरी । पनवेल**

आपल्या सर्वांना सन्मानाने जगण्याची प्रेरणा ही छत्रपती शिवाजी महाराजांमुळे मिळालेली आहे. त्यामुळे महाराजांना अभिवादन करीत दिवाळी साजरी करीत आहोत, याचा मनापासून आनंद होत असल्याचे उद्गार भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी काढले. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित केलेल्या दीपोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाचे केदार भगत मित्र मंडळाने आयोजन केले होते.

कोरोनाच्या प्रदीर्घ काळानंतर दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी होत आहे. या उत्सवाच्या अंतर्गत पनवेल छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यासाठी केदार भगत मित्र मंडळाने दीपोत्सवाचे आयोजन गुरुवारी केले होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून शुभारंभ करण्यात आला. या वेळी त्यांनी सांगितले की आपण जी संस्कृती अभिमानाने जगतो त्या संस्कृतीचे प्रतिक म्हणजे प्रभू श्रीराम आणि छत्रपती शिवाजी महाराज आहेत. आपल्याला सर्वांना सन्मानाने जगण्याची प्रेरणा ही महाराजांमुळे मिळालेली आहे.

त्यामुळे महाराजांना अभिवादन करीत दिवाळी साजरी करत आहोत याचा मनापासून आनंद होत आहे, तसेच केदार भगत मित्र मंडळाने या कार्यक्रमाचे आयोजन केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

या दीपोत्सव कार्यक्रमास नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर आदी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी स्वतः केदार भगत यांच्यासह सुमित दसवते, अभिजित साखरे, नितेश भगत, हर्षद गडगे, संकेत दसवते, योगेश साळवी, शे-षनाथ गायकर, सचिन जचक, कपिल कुरघुडे, गौरव सावंत, साहिल मोरे, भावेश शिंदे, संतोष वर्तले, मंदार भगत, मंगेश भगत, अनिल भगत, प्रमोद भगत, अरुण मढवी, यनेश पाटील, अथर्व पाटील, प्रतीक डांगरे, चेतन म्हसकर, साहिल डांगरे, प्रथमेश धनावडे, मितेश भोपी तसेच महिला निकिता पाटील, योगिता डांगरे, गीतांजली भगत, दीपाली म्हसकर, निर्मिती म्हसकर, शिवानी डांगरे, सृष्टी सावंत, अंजली ठाकूर, अनिता मढवी आदी उपस्थित होते.

# ग्राहकांना नाडणाऱ्या विज वितरण कंपनी विरोधात म्हसळा तालुका संघर्ष समिती आंदोलन करणार : बाळ करडे

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्यादित कार्यालय म्हसळाचे अनागोंदी कारभाराबाबत ग्राहकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.अनेक कारणाने ग्राहकांना विज वितरण कंपनी नडत आहे. तालुक्यातील विज ग्राहकांना योग्य वागणुक व सेवा न मिळाल्यास विज वितरण कंपनी विरोधात मोर्चा काढण्यात येणार असल्याचे म्हसळा तालुका संघर्ष समितीचे अध्यक्ष सुभाष उर्फ बाळशेट करडे यांनी म्हसळा तहसीलदार समीर घारे यांना निवेदन सादर करून नमुद केले आहे.

निवेदनात त्यांनी विज वितरण कंपनी १०० रुपये वापराच्या विज बिलावर २४० रुपये अधिभार लावुन लुट करीत आहे तसेच आकारणी केलेले विजचे बील भरणा करण्यासाठी ग्राहकांकडे सातत्याने तगादा लावत आहे. एखाद्या महिन्यात ग्राहकांना विज बील भरणा करण्यास उशीर झाल्यास थेट विज पुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात येत आहे.ग्राहक विजेच्या तक्रार निवारणासाठी कार्यालयात गेल्यास त्यांना संबंधित विज अभियंता आधी सर्व विज बिल भरणा करा मग काय ते पाहु अशी उद्दट आणि दुरुत्तरे देत आहेत. विज कंपनीने बिलावर अवाजवी दंड आकारून ग्राहकांची लुट सुरू केली असुन कोरोना काळात घरदार बंद असलेल्या ग्राहकांना अवाजवी विज बिल पाठवुन मोठ्या रकमांची वसुली करून फसवणुक केली जात असल्याने विज वितरण कंपनीने त्यांच्या अनागोंदी कारभारात सुधारणा करावी.कंपनीच्या कारभारात सुधारणा होणार नसेल तर त्यांचे विरोधात मोर्चा काढण्यात येणार असल्याचे निवेदन म्हसळा तालुका संघर्ष समिती अध्यक्ष सुभाष उर्फ बालशेट करडे,उपाध्यक्ष बाबाजान पठाण यांनी म्हसळा तहसीलदार समीर घारे यांना दिले आहे.

हसळा तहसीलदार यांनी विज वितरण कंपनीच्या अधिकारी वर्गाकडे चर्चा करून ग्राहकांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी केली आहे.विज वितरण कंपनीचे कारभतात सुधारणा न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचे करडे यांनी निवेदनात आवर्जुन नमुद केले आहे. योग्य व पुढील कार्यवाहीसाठी म्हसळा तालुका संघर्ष समितीने राज्याचे उर्जा मंत्री नितीन राऊत यांना म्हसळा तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनाची प्रत पाठवली आहे.

# पनवेल महानगरपालिका

**ता.पनवेल, जि.रायगड, पिन नं.४१०२०६**

कार्यालय जा.क्र.पमपा/कर/हस्तां./२२२१/ /२०२१ दि. / /२०२१

**वाचा :- महाराष्ट्र महानगरपालिका आधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १ ते ४**

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलात नमूद केलेल्या मालमत्तांचे पनवेल महानगरपालिकेकडील कर आकारणी नोंद वहितील नावांत बदल करणेबाबतचे प्रस्ताव इकडेस दाखल झालेले असून, त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

| अ. क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट नं. सदनिका / गाळा क्र. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | ९ | प्रॉपर्टी क्र.९१२/१ ते ७, शॉप क्र. ए-११, एम.जी.रोड, पनवेल | राजपती हरिप्रसाद चौहान | सुनिल हरिप्रसाद चौहान |
| २ | १३ | फा.प्लॉट क्र.४०७, सदनिका क्र.१०६, निळकंठ वंदन सोसा.पनवेल | मे.रुपा असोसिएट्स | स्वप्निल संदीप भोईर, संगीता संदीप भोईर |
| ३ | १३ | फा.प्लॉट क्र.४११, सदनिका क्र.२११, चिंतन अपार्टमेंट, पनवेल | केसरबेन मुलजी ठक्कर | अशा नितीन गणात्रा लग्नापूर्वीचे नाव मिस आशा मुलजी ठक्कर |
| ४ | १४ | सर्व्हे क्र.७९७/२, सदनिका क्र.बी-२०५, प्रेस्टीज गार्डन सोसा, पनवेल | विठ्ठल रघुनाथ वाघमारे | शोएब निसार शेख, खुर्शिदा बेगम निसार अली शेख |
| ५ | ९ | फा.प्लॉट क्र.२१२/२१३ अे, ऑफिस नं.एफ-३०, जसदनवाला कमर्शियल कॉम्प्लेक्स, पनवेल | सुरिंदर कॉर साहनी उर्फ सुरिंदर कौर आनंद | कौची साहनी सन ऑफ भुपिंदर सिंह साहनी |
| ६ | १६ | फा.प्लॉट क्र.४५३ व ४५६, रो हाऊस क्र.१५, तक्का पनवेल | राजकुमारी कोहली | रामनाथ विश्वनाथ पराडकर |
| ७ | १४ | सर्व्हे क्र.४८३/१,२,३ सदनिका क्र. बी-४२, बिल्डींग ०१, पनवेल | जयशंकर पांडे | संतोषकुर जठशंकर पांडे |
| ८ | १० | सी.टी.एस.क्र.१२७८/ए, बी १२८१/ए, १२८१/११, १२८३ व १३३८/१, सदनिका क्र.डी-७, मुनोथ नगर सोसा, पनवेल | सुनिल शिवराम सुतार प्रकाश दामोदर धुमाळ हिमांशु मौर्या सन ऑफ प्रेम चंद्रा मौर्या | संतोष राजाराम सुर्यवंशी, सीमा संतोष सुर्यवंशी |
| ९ | २ | सिटी एस क्र.९६७, ९६८ अे व ९६८ बी, गाळा क्र.४, माऊली कृपा सोसा, पनवेल | श्री स्वस्तिक डेव्हलपर्स निकम अंजली इंद्रजित रजनी भरत ठाकूर | किसनलाल रामपाल दिवाकर |
| १० | OP ९९ | सिटी सर्व्हे क्र.२१४, २१४/१, २१५, २१६, २१६/१, २१७/१, २१७/ए, बी, पार्क प्लाझा, पनवेल | मे.ए.गुबित्रा डेव्हलपर्स | हमजा कासम खतिब, तरन्नूम हमझा खतिब |
| ११ | १० | फा.प्लॉट क्र.१३५, सदनिका क्र.१५, मारुती अपार्टमेंट, पनवेल | नरेश आत्माराम तांबोळी यांच्या कायदेशीर वारस प्रथमेश नरेश तांबोळी | दादासो सखाराम रोकडे, कोमल दादासो रोकडे |
| १२ | OP ९९ | सीटी एस क्र.१३९, सदनिका क्र.२०१, अफीफ मंजिल, पनवेल | मे.खामकर होम्स तर्फे मालक सलीम रफिक खामकर | रेहान अहमद रियाजुलहक खान |
| १३ | OP ९९ | सर्व्हे क्र.७४३/२, ३ ए, ४ पी, ५ च ८ पी सदनिका क्र.४०४, अपटाऊन अवेन्यू, पनवेल | मे.सिमरन इंटरप्रायजेस तर्फे भागीदार सागर अग्रवाल यांच्या तर्फे कु मु म्हणून विनोद अग्रवाल | अमित गिरीश मेहता, प्रियांका अमित मेहता |
| १४ | OP ९९ | सर्व्हे क्र.७४५, सदनिका क्र.ए-३०३, जिंदाल रेसिडेन्सी, पनवेल | मे.जिंदाल बिल्डर्स | निलप्रभा राहूल उबाळे, राहूल लक्ष्मण उबाळे |
| १५ | OP ९९ | सीटीएस क्र.७३९, सदनिका क्र.१०२, अफिफ मंजिल, पनवेल | मे.खामकर होम्स तर्फे मालक सलीम रफिक खामकर | खुर्शीदबी नुरखान पठाण |
| १६ | OP ९९ | सिटी सर्व्हे क्र.११६१, सदनिका क्र.३०४, निर्मल आंगण, पनवेल | तलाल ए.मजीद मुल्ला | नदीम रहीम बागवान |
| १७ | OP ९९ | फा.प्लॉट क्र.२१/A-२, सदनिका क्र.३०५, सागर दीप सोसा, पनवेल | प्रवीण प्रभाकर भिसे, प्रणिता प्रवीण भिसे | प्रतिका संदीप साळवी |
| १८ | १२ | फा.प्लॉट क्र.१२७/८, सदनिका क्र. ४०१, बिबिका सोसा., पनवेल | विजय दिनका कांबळे | विजय दिनकर देसाई |
| १९ | १ | प्लॉट क्र.३४/०४, सदनिका क्र.२१, कोणार्क प्लाझा, पनवेल | सलीम अब्दुल करीम वाराकिया, कौसर सलीम वाराकीया | जावेद इस्माईल कोकाटे |
| २० | १६ | प्लॉट क्र.४४८, सदनिका क्र.४०२, एस-३, रिव्हरसाईड पार्क, तक्का, पनवेल | मे.मोराज बिल्डींग कन्सेप्ट प्रा.लि.तर्फे डायरेक्टर मोहन टी.गुरनानी यांचे कु.मु.संजय टकले | प्रदीप कुमार सचान, प्रीथा प्रदीप सचान |
| २१ | ७ | सिटीएस क्र.१६३/१, १४७/१, १४७/ए, १६३, सदनिका क्र.३०४, पारस अपार्टमेंट पनवेल | आसमा शोएब शेख, शोएब गुलाम बशिर शेख | रिजवान अब्दुल लतीफ शेख |
| २२ | १ | सिटी सर्व्हे क्र.४६५, सदनिका क्र.३०२, नटराज अपार्टमेंट, पनवेल | मे.कैलासपती असोसिएटर्स | ज्योत्स्ना हेमांग शाह, हेमांग हिरजी माहेश्वरी (शाह) |
| २३ | १० | सीटी एस क्र.१३६८, १३६८/१, १३६९/१ ते ६, १३७०, १३७०/१ व १३७१, सदनिका क्र.०२, पारस प्लाझा पनवेल | शंकर कानू पारंगे | किशोर बाबुराव भगत |
| २४ | १४ | फा.प्लॉट क्र.५३७, सदनिका क्र.४०१, पंकज व्हिला सोसा, पनवेल | एम.जे.बिल्डर्स, अनिता प्रशांत पाटील | गीता नितीन पाटील |
| २५ | १ | सिटी सर्व्हे क्र.४९५/अ,ब,क, ४९६/अ, घर टिळक रोड, कापड बाजार, पनवेल | सुरजमल भगीरशेठ मारवाडी | ओमप्रकाश सुरजमल झंवर |

वरील बाबत प्रकरणे परत्वे आवश्यकतेनुसार पनवेल महानगरपालिका कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्यांच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधिन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत महानगरपालिकेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमूद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे नावात बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ कराधान नियम १६ ते २० नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**(वंदना गुळवे)**
**सहा.आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**